मा. जिल्हाधिकारी, पालघर यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा निर्यात प्रचालन समिती बैठक दि.१२.१२.२०२२ रोजी संपन्न् झालेल्या जिल्हा निर्यात प्रचालन समितीच्या बैठकीचे इतिवृत्त

---

दिनांक १२/१२/२०२२ रोजी सकाळी ११.४५ वाजता पालघर जिल्हयासाठी निर्यात प्रचालन समिती बैठक मा. जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर, जिल्हा पालघर येथे मा. जिल्हाधिकारी, पालघर यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली होती. सदर बैठकीसाठी खालील प्रमाणे पदाधिकारी उपस्थित होते.

| क्र. | अधिकारी / सदस्य यांचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | Shri. Govind Maruti Bodake | Hon'ble Collector, Palghar |
| २ | Shri. Vikrant Patil, | LDM, Bank of Maharashtra |
| ३ | Shri. S. K. Ashwini | DDM, Nabard, Palghar |
| ४ | Shri. Amol Sonone | Fisheries Dept., Palghar |
| ५ | Shri. Velji Gogri | President- Tarapur Industries Mfg. Association (TIMA) |
| ६ | Shri. S. L. Sharma | Tarapur Industries Mfg. Association (TIMA) |
| ७ | Shri. Ravi Bhavsar | Tarapur Industries Mfg. Association (TIMA) |
| ८ | Shri. Papa Thakur | Vice- President - Tarapur Industries Mfg. Association (TIMA) |
| ९ | Shri. Mahendra Singh | Tarapur Industries Mfg. Association (TIMA) |
| १० | Shri H. P. Solnaki | Achhad Industrial Association, Talasari |
| ११ | Shri. Ajit Narvekar | Achhad Industrial Association, Talasari |
| १२ | Shri. Anil Khatri | M/s. Ravasco Transmission, Achhad, Talasari |
| १३ | Shri. Santosh Gore | M/s. Tema India Ltd., Achhad, Talasari |
| १४ | Shri. Sunil Akrekar | Fish Cluster, Vikramgad |
| १५ | Shri. Jayesh Akre | Fish Exporter |
| १६ | Shri. Prakash Patil | Fish Exporter |
| १७ | Shri Prashant Bhoir | Vasai Taluka Inds. Co-Op. Society |
| १८ | Shri. Arvind Patil | Vasai Taluka Inds. Co-Op. Society |
| १९ | Shri. Pradip Lalit | Vasai Taluka Inds. Co-Op. Society |
| २० | Shri Pravin Khanvilkar | Palghar Taluka Inds. Co-Op. Society |
| २१ | Smt. V.B. Sone | General Manager, District Inds. Centre, Palghar |

श्रीमती व्हि.बी. सोने, महाव्यवस्थापक, जिउके पालघर यांनी District Export Action Plan यांचे सविस्तर सादरीकरण करुन चर्चा करण्यात आली. पालघर जिल्ह्याकरीता ODOP अंतर्गत चिक्कू उत्पादन व Marine Products हे दोन असल्याबाबत

सभेस सांगितले तसेच चिक्कू प्रक्रिया उद्योगांस चालना मिळणेसाठी राज्य शासनाच्या समूह विकास योजनेंतर्गत मौजे ब्राम्हणगांव, पोष्ट बोडीं ता. तलासरी जि. पालघर येथे व मरीन प्रोडक्ट्स उद्योगांस चालना मिळणेसाठी राज्य शासनाच्या समूह विकास योजनेंतर्गत ता. विक्रमगड, जिल्हा पालघर येथे सामायिक सुविधा केंद्र स्थापनेचे कामकाज सुरु करण्यांत आले असून या माध्यमातून उत्पादन व निर्यात वाढीसाठी प्रयत्न होणार असल्याने उद्योजकांनी या वस्तूचे उत्पादनासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. याबाबत उपस्थित फिश क्लस्टरच्या सदस्यासोबत मा. अध्यक्षांनी सविस्तर चर्चा केली.

महाव्यवस्थापक, जिउके पालघर यांनी Critical Infrastructure and TIES Scheme बाबत माहिती दिली आणि सदर Scheme अंतर्गत Testing Lab. व Cold Storage इ. अंतर्गत प्रस्ताव कार्यालयास सादर करावा असे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले. ODOP चे booklet संबंधी पालघर जिल्ह्यातील प्रत्येक रेल्वे स्टेशन वर (One Station One Products) जाहीरात करणेसंबंधी मा. अध्यक्षांनी सुचना दिल्या. रस्ते, दिवाबत्ती, पाणी, वीज इ. बाबत अडचणीबाबत उपस्थित औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधी समवेत चर्चा करण्यात आली व सदर सविस्तर प्रस्ताव संबंधित कार्यालयास अग्रेषित करणेबाबत निर्देश देण्यात आले.

मा. जिल्हाधिकारी, पालघर यांनी औद्योगिक क्षेत्रासाठी मरीन प्रॉडक्टस व कृषी प्रक्रियेंतर्गत चिकू उत्पादन या एक जिल्हा एक उत्पादन या निवड करण्यांत आलेल्या वस्तूंचे उत्पादनासाठी जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात वाव असल्यामुळे उद्योजक/ उत्पादक यांनी सदर वस्तूंचे उत्पादनासाठी औद्योगिक गुंतवणूकीचे माध्यमातून प्रयत्न करुन या वस्तूंची जास्तीत जास्त निर्यातीवाढीसाठी प्रयत्न करण्यांचे आवाहन सर्व उपस्थित उद्योजक/ निर्यातदार व औद्योगिक संघटना यांना केले. चिक्कू उत्पादन व Marine Products बाबत data analysis – Export करणाऱ्या उद्योजकांची यादी या कार्यालयास सादर करण्याचे निर्देश मा. अध्यक्षांनी संबंधितांना दिले.

शेवटी श्रीमती व्हि.बी. सोने, महाव्यवस्थापक, जिउके पालघर यांनी सदरची बैठक संपन्न झाल्याचे जाहिर केले.

महाव्यवस्थापक, जिउकें पालघर
तथा
सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती

मा. जिल्हाधिकारी, पालघर.
तथा
मा. अध्यक्ष जिल्हा निर्यात प्रचालन समिती